# महाराष्ट्र शासन

क्र.एफएलडी-१२१४/ प्र.क्र.१७५/ फ-१०

E-mail: deskf10.rfd-mh@gov.in

महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : ०२.०५.२०२२

**प्रति,**

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
अपर मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर
मुख्य वनसंरक्षक (प्रा.), कोल्हापूर
उपवनसंरक्षक (प्रा.), कोल्हापूर

**विषय: वनजमीन- कोल्हापूर**
चांदोली वन्यजीव अभयारण्यातील मौ. निवळे या गावाचे कागल, जि. कोल्हापूर येथे पुनर्वसन करण्यासाठी ६३.०९१ हे. वनजमीन वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत वळती करणेबाबत.

**संदर्भ:** अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी यांचे पत्र क्र. Desk-17/Nodal/Kolhapur/ID-12880(28)/2596/2021-2022, दि.०३.०३.२०२२

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये चांदोली वन्यजीव अभयारण्यातील मौ. निवळे या गावाचे कागल, जि.कोल्हापूर येथे पुनर्वसन करण्यासाठी ६३.०९१ हे. वनजमीन वन (संवर्धन) अधिनियम, १९८० च्या कलम २ (ii) अंतर्गत वळती करणेबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे. सदर प्रस्ताव केंद्र शासनास पाठविता यावा याकरिता खालील मुद्यांबाबतची माहिती शासनास सादर करावी:-

१) मुख्य वनसंरक्षक तसेच उपवनसंरक्षक यांच्या स्थळ पाहणी अहवालात जिल्हाधिका-यांनी गलेगले येथील खाजगी व्यक्तीची १६ हे. संपादित केलेली जमीन पुनर्वसनासाठी दिली होती असे नमूद आहे. मात्र ती जमीन परत दिल्यामुळे ६३.०९१ हे. वनजमीन वळतीकरणाचा प्रस्ताव सादर केला आहे. सदर क्षेत्रातील तफावतीबाबत अधिक स्पष्टता येणे आवश्यक आहे.

२) उपवनसंरक्षक यांच्या प्रमाणपत्रात ३४७०५ वृक्षांची तोड करण्यात आली असल्याचा उल्लेख आहे. त्याबाबत अधिक स्पष्टीकरण व्हावे.

(गणेश जाधव)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन